D.A.V. PUBLIC SCHOOL,THANE

SESSION 2021-2022

PERIODIC TEST-III

SUBJECT- MARATHI

STD -VIII **MAX.MARKS -40**

DATE -24/01/2022 **TIME- 1 HR.30 M.**

सूचना:

- **प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत .दोन्ही विभाग सोडविणे आवश्यक.**
- **विभाग अ = २० गुण . गद्यउतारा आणि व्याकरण .**
- **विभाग ब = २० गुण . पाठावरील प्रश्न आणि पत्रलेखन .**

विभाग -अ

प्रश्न १ खालील उतारा काळजी पूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवडा . ६

ही एका खेड्यातील गोष्ट आहे .काही विचारी गावक-यांनी गावात एक शाळा बांधली. त्यांचे स्वप्न होते,गावातल्या मुलांनी शाळेत जावे ,खूप शिकावे ,शहाणे व्हावे . मुले शाळेत आनंदाने आली पाहिजेत , म्हणून त्यांनी शाळेजवळ खेळासाठीमैदान केले. खेळाचे सामान आणले. शिक्षकसुद्धा नेमले .पण शाळेत मुलेच येईनात.फक्त पाच-सहाच मुले आली . बाकीची मुले रानात जात .गुरे राखत. आईवडिलांनाशेतीत मदत करत . गाडगेबाबांनी सर्व गावक-यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले .मग त्यांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवले .

प्रश्न १ . गावक-यांचे कोणते स्वप्न होते?

अ) खूप शिकावे ,शहाणे व्हावे ब)शाळेत जाऊ नये क) खेळत राहावे ड) नेहमी हसत राहावे .

२ .शाळेजवळ मैदान का केले होते ?

अ) मुलांनी खेळावे . ब) मुले आनंदानी शाळेत जावीत.

क) मुलांनी शांत बसावे. ड) मुलांनी कुस्ती करावी .

३ .सुरवातीला किती मुले शाळेत आली ?

अ) पाच -सहाच मुले ब) सात -आठ क) एक -दोन ड) दहा -बारा

४ .बाकीची मुले काय करत ?

अ) पोहायला जात ब) रानात गुरे राखत , शेतीत मदत करत.

क) क्रिकेट खेळत ड) घरी राहत .

५ . मुले कोणामुळे शाळेत जाऊ लागली ?

अ) संत गाडगेबाबा ब) संत तुकाराम क) संत नामदेव ड) संत रामदास

६ . खेड्यातील गावकऱ्यांनी काय बांधले ?

अ) देऊळ ब) शाळा क) इमारत ड) पूल

प्रश्न २ . खालील प्रश्नाचे पर्याय निवडा . १४

१. त्याने हापूस आंबा खाल्ला . (या वाक्यातील सर्वनाम ओळखा .)

अ) हापूस ब) त्याने क) आंबा ड) खाल्ला

२. गणेश रोज अभ्यास करतो . (या वाक्यातील विशेषनाम ओळखा .)

अ) करतो ब) गणेश क) रोज ड) अभ्यास

३. आकाश दररोज पूजा करतो .(या वाक्यातील क्रियाविशेषण ओळखा .)

अ) पूजा ब) आकाश क) दररोज ड) करतो .

४. घरासमोर सुंदर बाग आहे . (या वाक्यातील शब्दयोगी ओळखा .)

अ) सुंदर ब) बाग क) घरासमोर ड) आहे

५. गीताचे केस लांब आहेत . (या वाक्यातील विशेषण ओळखा .)

अ) गीताचे ब) आहेत क) केस ड) लांब

६ . ठाणे शहर सुंदर आहे . (या वाक्यातील सामान्य नाम ओळखा .)

अ) ठाणे ब) शहर क) आहे ड) सुंदर

७ . खालील वाक्यांपैकी वर्तमानकाळी वाक्य शोधा .

अ) मी अभ्यास केला . ब) मी अभ्यास करतो .

क) मी अभ्यास करेन . ड) मी अभ्यास केला होता .

८. ' त्याने गाणे गायले .' या वाक्याचे योग्य भविष्यकालीन वाक्य ओळखा .

अ) त्याने गाणे गात होता ब) तो गाणे गातो .

क) तो गाणे गाईल. ड) तो गाणे गात होता .

९. 'शेळी' या शब्दाचा अनेकवचनी शब्द कोणता ?

अ)शेळ्या ब) बोकड क) शेळू ड) शेळी

१०. ' दुकाने ' या शब्दाचा एकवचनी शब्द कोणता ?

अ) दुकाना ब) दुकानांना क) दुकान ड) दुकानो

११. ' मित्र ' या शब्दासाठीचा स्त्रीलिंगी शब्द कोणता ?

अ) मैत्रिण ब) सखी क) मैत्री ड) मंत्री

१२. ' माकडीण' या शब्दासाठी पुलिंग शब्द कोणता ?

अ) माकड ब) माकडी क) मकडी ड) माकडा

१३ ' रोड' या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा .

अ) बारीक ब)रस्ता क) जाड ड) रोडी

१४. 'आकाश ' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा .

अ) गंगा ब) पाताळ क) चांदणे ड) मेघ

विभाग -ब

प्रश्न ३ एका वाक्यात उत्तरे लिहा . (कोणतेही -५) ५

१ झुळूक कोणाच्या मुखावर टवटवी आणणार आहे ?

२ झुळूक विसावा केव्हा घेईल ?

३ जनावरांचे इस्पितळ कुठे आहे?

४ साखळीला सारखे हिसके कोण देत होते?

५ आंधळ्या मांजरीला बाहेर का सोडत नव्हते?

६ गंगोत्रीवर काय झाले होते ?

प्रश्न ४. थोडक्यात उत्तरे लिहा .(कोणतेही ३ लिहा.) ९

१ झुळूकेची परोपकारी वृत्ती तुमच्या शब्दात लिहा.

२ सर्वच प्राणी माणसाच्या प्रेमासाठी भुकेलेले असतात हे विधान पाठाच्या आधारे पटवून द्या .

३ लेखिकेचे लक्ष वेधून घेण्यासाठी मांजरांनी केलेल्या कृती लिहा.

४ ईशान व त्याचे सहकारी यांनी यात्रेकरूना केलेली मदत लिहा .

प्रश्न ५ खालील पैकी कोणत्याही एका विषयावर गोष्ट लिहा . ६

कावळ्याला मासा सापडला ---------कावळ्याने मासा धरला --------झाडावर नेऊन बसला --------- कोल्ह्याने पाहिले---------- कोल्ह्याला मासा हवा होता ---------- कावळ्याला म्हणाला तुमचा आवाज छान ---------- -कोल्ह्याच्या स्तुतीने हुरळून जातो------मासा खाली पडला --------- कोल्ह्याने मासा पटकन उचलला .

किंवा

एका राजाला सोन्याचा खूप लोभ होता ----------परमेश्वराची खूप प्रार्थना -----परमेश्वर प्रसन्न -------हात लावेन ते सोने व्हावे असा वर मागितला -सर्व वस्तू सोन्याच्या बनू लागल्या ----------राजाला आनंद -------- -जेवण सोन्याचे -------मुलगी सोन्याची ------- राजा दु:खी ------- चूक कळली .
